## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
## काकडा

उठा उठा हो साधक, साधा आपुलाले हित
गेला गेला हा नरदेह, मग कैचा भगवंत ॥धृ. ॥

उठा हो वेगेसी चला, जाऊ वांगणी मंदिरी
झडतील पातकांच्या राशी, काकड आरती पाहोनी ॥1॥

जागे करा वांगणीबाबा देव आहे त्रिभुवनसुरा
वेगे निंबलोण करा, दृष्ट होईल म्हणूनिया ॥2॥

उठोनिया हो पहाटे बाबांना पहा हो मंदिरी
चरण तयांचे गोमटे, अमृत दृष्टी अवलोका ॥3॥

पुढे घंटा नाद होती ढोल ढमामे गर्जती
होते काकड आरती माझ्या बाबादेवाची॥4॥

सिंहनाद शंख वाजती, गजर होतो वांगणी मंदिरी
ममदे समदे उभे असती, बाबा चरण वंदण्या॥5॥

★★★★★